अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक
कारागृह व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य,यांचे
कार्यालय,जुनी मध्यवर्ती इमारत,२ रा मजला,पुणे-१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२४८१५
फॅक्स क्र. ०२०-२६१२५८७८
Email-igoffice.budget-mh@gov.in

---

परिपत्रक

जा.क्र.अपोमसंवकामनि/पुणे/क-५/कुकनिवैअग्रिम/९४६५ दि. ०५/१०/२०१६

विषयः-कुटुंब कल्याण निधीतून देण्यात येत असलेल्या वैद्यकीय अग्रिमाबाबत.

संदर्भः-मुख्यालयाचे परिपत्रक क्र.लेखा/कुकनि/वर्गणी-शिष्युवृत्ती/ १०८५/ २०१२/क-५ दि.५/२/२०१३

उपरोक्त संदर्भाकिंत विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील गणवेशधारी अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवाबल कुटुंब आरोग्य योजना दिनांक १५ ऑगस्ट २०१६ पासून लागू करण्यात आलेली असून या योजनेचा लाभ गणवेशधारी अधिकारी/कर्मचारी सद्या घेत आहेत.

सद्या मुख्यालयाकडून कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय कारणास्तव परतावा स्वरुपात वैद्यकीय अग्रिम देण्यात येत आहे. तरी महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवाबल कुटुंब आरोग्य योजना सुरु करण्यात आलेली असल्याने शक्यतो गणवेशधारी अधिकारी/कर्मचारी यांनी वैद्यकीय कारणास्तव कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय कारणास्तव अग्रिमाची लेखी मागणी करण्यापेक्षा या योजने अंतर्गत असलेल्या आजारांवर व मुख्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना व मार्गदर्शक पुस्तिकामध्ये नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने या योजनेसाठी नियुक्त केलेल्या हॉस्पिटलमध्ये जावून वैद्यकीय उपचार घेणे उचित होईल. जेणे करुन या योजनेचा लाभ जास्तीत जास्त गणवेशधारी अधिकारी/कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांना घेता येईल.

कार्यालय प्रमुखांनी गणवेशधारी अधिकारी/कर्मचारी यांनी वैद्यकीय कारणास्तव कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय अग्रिमाची लेखी मागणी केल्यास त्या गणवेशधारी अधिकारी/ कर्मचा-यास या योजनेबाबतची संपूर्ण माहिती देवून त्यास महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवाबल कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ घेणेबाबत समज द्यावी.

P.T.O

तसेच मुख्यालयाकडून निर्गमित केलेल्या मार्गदर्शक पुस्तिकेमध्ये नमूद केलेले आजार व पात्रतेच्या अटीत एखादा गणवेशधारी अधिकारी/कर्मचारी बसत नसल्यास असा अधिकारी/कर्मचारी कुटुंब कल्याण निधीतून वैद्यकीय कारणास्तव परतावा स्वरुपात उपचाराकरीता वैद्यकीय अग्रिमाची लेखी मागणी विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक यांचे मार्फत व शिफारशीसह करु शकतो.

**सर्व अधिनस्त कार्यालये/कारागृहे यांनी सद्या त्यांचेकडे कुटुंब कल्याण निधीमध्ये शिल्लक असलेल्या रकमेच्या ८० टक्के रक्कम तातडीने मुख्यालयास पाठविण्यात यावी तसेच दरमहा जमा होणा-या रकमेच्या ८० टक्के रक्कम प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यत मुख्यालयास न चुकता पाठविण्यात यावी व उर्वरित २० टक्के किंवा आवश्यकतेनुसार रक्कम संबंधित कार्यालये/कारागृहे यांनी त्यांचेकडे ठेवावी.**

**या परिपत्रकाची समज सर्व गणवेशधारी अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात यावी व परिपत्रकाची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यांची सर्वस्वी जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.**

(डॉ.भूषण कुमार उपाध्याय )
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व
सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

प्रति,

१) विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) दक्षिण विभाग,भायखळा,मुंबई
२) कारागृह उपमहानिरीक्षक,पुणे/नागपूर/औरंगाबाद
३) प्राचार्य,दौलतराव जाधव तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,पुणे.६
४) अधीक्षक,मध्यवर्ती कारागृह (सर्व)
५) अधीक्षक,जिल्हा कारागृह (सर्व)
६) अधीक्षक,खुले जिल्हा कारागृह (सर्व)
४) प्राचार्य,किशोर सुधारालय,नाशिक
५) अधीक्षक,रत्नागिरी विशेष कारागृह,रत्नागिरी.
६) अधीक्षक,स्वतंत्रपूर खूली वसाहत,आटपाडी जि.सांगली

<u>प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठीः-</u>

१) स्वीय सहाय्यक,अपोमसंवमकावससु,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१.
२) लेखा अधिकारी, अपोमसंवमकावससु,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१.